**पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठीचे १० % समांतर आरक्षण आणि कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे याची राज्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण १११९/प्र.क्र.८९/१६-अ**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ मे, २०१९

वाचा -

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. पअंक १००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि. २७.१०.२००९
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. अंशका १९१८/प्र.क्र.५०७/१६-अ, दि. २.०१.२०१९

प्रस्तावना -

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. २७ ऑक्टोबर, २००९ अन्वये राज्यातील पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १० % समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. तसेच दि. २ जानेवारी २०१९ च्या शासन निर्णयान्वये, राज्यातील पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना सरळसेवा भरतीसाठी विहित करण्यात आलेली कमाल वयोमर्यादा ४६ वरून ५५ वर्षे इतकी करण्यात आली आहे. सदर विहित तरतुदींनुसार पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांची पदभरती होणे आवश्यक आहे.

**शासन परिपत्रक -**

राज्यातील पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १० % समांतर आरक्षणाची तसेच त्यांच्यासाठी नियुक्तीकरिता वयोमर्यादा ४६ वरून ५५ वर्षे इतकी करण्यात आल्याबाबतच्या शासन निर्णयाची सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी पदभरती करताना काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

या परिपत्रकातील सूचना शासकीय /निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, महामंडळे, मंडळे, शासन अनुदानित संस्था व ज्यांना मार्गदर्शक सूचना देण्याचे अधिकार शासनाला आहेत अशा सर्व संस्था व सेवा यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील. सदर सूचना प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांच्या निदर्शनास आणाव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०५२८१३५३५२४५०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c8191e7389cff5eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2019.05.28 13:57:02 +05'30'

**( टि. वा. करपते )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई
५. सर्व मा. संसद सदस्य / मा. विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
६. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव
८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
९. प्रबंधक, उच्च न्यायालय मूळ शाखा, मुंबई/औरंगाबाद /नागपूर
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय अपिल शाखा, मुंबई/औरंगाबाद /नागपूर
११. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/औरंगाबाद /नागपूर
१२. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त, मुंबई
१३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग
१४. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
१५. सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
१६. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई /नागपूर
१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (प्रसिद्धीकरिता ५ प्रती)
१८. मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख
१९. सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी
२०. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२२. सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा / नगरपालिका
२३. राज्यातील सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२४. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई ( १० प्रती)
२५. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य
२६. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने / निवड नस्ती / १६-अ.